# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

**मुकुंदनगर, गुलटेकडी, पुणे - ४११०३७.**

**शालेय प्रसार परीक्षा विभाग**

दूरध्वनीः०२०-२४४०३०४३,२४४०३०९०, ई.मेल-tmvshaleyaprasar@gmail.com, वेबसाईटः www.tmv.edu.in/schoollevelexam.asp


दि. २४ नोव्हेंबर २०१८

प्रति,
मा. मुख्याध्यापक
सप्रेम नमस्कार,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गेली ७ दशके शालेय विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवत आहे शालेय अभ्यासक्रमास अनुलक्षून घेण्यात येणा-या विविध विषयांच्या परीक्षा हया त्यापैकीच एक उपक्रम होय. विद्यार्थ्यांना अवघड वाटणा-या विषयांचा पाया अधिक पक्का व्हावा, त्यांचे सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापन व्हावे व त्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी या उद्देशाने या परीक्षांची आखणी करण्यात आलेली आहे. त्यामुळेच या परीक्षा शाळा, विद्यार्थी व पालक वर्गामध्ये मान्यता पावल्या आहेत. या परीक्षांना आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभेल अशी अपेक्षा आहे.

सोबत सत्र फेब्रुवारी २०१९ मध्ये होणा-या परीक्षांचे वेळापत्रक व सप्टेंबर २०१८ मध्ये झालेल्या परीक्षांचा निकाल व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी पाठवित आहोत. या परीक्षांच्या संदर्भात काही महत्वाची माहिती या माहितीपुस्तिकेत पुढीलप्रमाणे दिली आहे. या सर्व माहितीची नोंद घ्यावी व आपला प्रतिसाद वृद्धिंगत करावा ही विनंती.

## महत्त्वाची सूचना -

**फेब्रुवारी २०१९ सत्रासाठी परीक्षा विषयी खालील महत्ताचे बदल झाले असून त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.**

१. बहुसंख्य शाळांच्या मागणीनुसार सत्र नोव्हेंबर व सत्र फेब्रुवारी २०१९ मध्ये १० वी च्या सर्व विषयांची परीक्षा होणार आहे. यापूर्वी नोव्हेंबर मध्येच घेतली जाईल असे कळविले होते.

२. यापूर्वी सुचित केल्याप्रमाणे संस्कृत या विषयाची प्रथमा व द्वितीया ही पुस्तके नव्याने संपादित केली असून दोन्ही परीक्षांसाठी फक्त एकच पुस्तक तयार करण्यात आले आहे. डिसेंबर मध्ये सदर पुस्तक उपलब्ध होत असून त्याचे शुल्क रू.५०/- राहील तसेच या पुस्तकांवर आधारित फेब्रुवारी २०१९ ची परीक्षा घेतली जाईल. तृतीया ते षष्ठी या परीक्षेसाठी जुनीच पुस्तके राहतील.

३. सप्टेंबर २०१८ सत्रापासून शुल्कामध्ये बदल केला असून इ. ४थी ते ७ वी रु. ८०/- व इ. ८वी ते १०वी रु. ९०/- असे शुल्क राहील. (शुल्काच्या सविस्तर तपशीलासाठी पान क्र. ९,१० व ११ पहावे.)

४. सप्टेंबर सत्रापासून गणित विषयाबरोबरच इंग्रजी, मराठी व विज्ञान या विषयांच्या इ. ४थी साठीच्या परीक्षा घेतल्या जातात. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची सदर परीक्षेसाठी नोंदणी करावी ही विनंती.

५. फेब्रुवारी २०१८ पासून यशस्वी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राच्या छपाईत आकर्षक बदल करण्यात आला आहे. तसेच पारितोषिक रोख रक्कमऐवजी ट्रॉफी दिली जाईल.

६. फेब्रुवारी २०१९ पासून ओडीसा नृत्यकलेच्या ४ परीक्षा (प्रथमा ते पदविका) सुरु करीत आहोत.

अजित खाडीलकर
कार्यवाह

## वार्षिक कार्यक्रम - २०१९

| फेब्रुवारी २०१९ सत्र परीक्षा | सप्टेंबर २०१९ सत्र परीक्षा |
|---|---|
| शुल्कासह यादी स्वीकारणे - दि. ३ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत | शुल्कासह यादी स्वीकारणे - दि.२ जुलै ते ३१ जुलै २०१९ पर्यंत |
| विलंब शुल्कासह - दि. १ जानेवारी ते ११ जानेवारी २०१९ | विलंब शुल्कासह - दि. १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०१९ |
| परीक्षा दिनांक - फेब्रुवारी / मार्च २०१९ महिन्यातील रविवार | परीक्षा दिनांक- सप्टेंबर २०१९ महिन्यातील रविवार |
| निकाल दिनांक- जून २०१९ महिन्यातील पहिला आठवडा | निकाल दिनांक- नोव्हेंबर २०१९ महिन्यातील शेवटचा आठवडा |

## फेब्रुवारी २०१९ सत्रातील परीक्षा कार्यक्रम

| वार व दिनांक | विषय (वेळ - स. १० ते १) | विषय (वेळ - दु. २ ते ५) |
|---|---|---|
| रविवार दि. ०३ फेब्रुवारी २०१९ | मराठी<br>नृत्यकला लेखी परीक्षा (मध्यमा, पदविका) | हिंदी<br>मराठी पाठांतर, मराठी लेखन कौशल्य |
| रविवार दि. १० फेब्रुवारी २०१९ | संस्कृत | विज्ञान<br>FFCE / SLCIT |
| रविवार दि. १७ फेब्रुवारी २०१९ | इंग्रजी | इंग्रजी लेखन कौशल्य, इंग्रजी संभाषण |
| रविवार दि. २४ फेब्रुवारी २०१९ | गणित, नृत्यकला प्रात्यक्षिक परीक्षा | जर्मन, जापनीज |

## विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा (मराठी, इंग्रजी, संस्कृत व हिंदी)

| | | |
|---|---|---|
| नाव नोंदणी तारीख | – | जून/जुलै २०१९ |
| स्पर्धा दिनांक | – | जून/जुलै २०१९ (स्पर्धा दिनांक नंतर कळविण्यात येईल) |
| स्पर्धा ठिकाण | – | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, जयंतराव संकुल इमारत, ७वा मजला, गुलटेकडी, पुणे ३७ |
| पारितोषिक वितरण | – | तिथीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी |
| पारितोषिक वितरण ठिकाण | – | लो. टिळक पुतळा, महात्मा फुले मंडई, पुणे (हस्ते – पुणे महानगरपालिकेचे महापौर) |

गटांची माहिती– **मराठी व इंग्रजी–गट. क्र१**– इ. ५ वी व ६ वी, **गट क्र.२** – इ. ७ वी व ८वी, **गट क्र.३**–९ वी व १०वी, **गट क्र. ४** –शिक्षकांसाठी (मराठी) **संस्कृत – गट.क्र १**– इ. ५ वी ते ७ वी, **गट.क्र २–** इ. ८ वी ते १० वी, **हिंदी** – **गट. क्र १**– इ. ५ वी ते ७ वी, **गट.क्र २ –** इ. ८ वी ते १० वी,

**टिप** : १. सर्व माध्यमात प्रत्येक गटात किमान २५ स्पर्धक असल्यास त्या गटात १,२,३ क्रमांकाची पारितोषिके दिली जातील अन्यथा केवळ प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दिले जाईल.

२. स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकास **रु. २५/– प्रवेश शुल्क** आकारण्यात येणार असून एका शाळेस प्रत्येक माध्यमास प्रत्येक गटासाठी जास्तीत जास्त स्पर्धकांना नोंदणी करता येणार आहे.

## नृत्यकला स्पर्धा (भरतनाटयम् व कथक शास्त्रीय नृत्यशैली)

| | | |
|---|---|---|
| नाव नोंदणी तारीख | – | जुलै २०१९ |
| स्पर्धा दिनांक | – | जुलै २०१९ (स्पर्धा दिनांक नंतर कळविण्यात येईल) |
| स्पर्धा ठिकाण | – | टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, जयवंतराव संकुल इमारत, ७ वा मजला, गुलटेकडी, पुणे ३७ |
| स्पर्धेस सादरीकरणासाठी वेळ | – | ५ मिनीटे (वेशभूषा आवश्यक) |

**सोलो डान्स** – गट. क्र १ – वय वर्ष १२ पर्यंत, गट क्र. २ – वय वर्ष १६ पर्यंत, गट क्र. ३ – खुला गट – १६ वर्षापुढील **प्रवेश शुल्क रु. १००/– प्रत्येकी**

**ग्रुप डान्स** – गट. क्र १ – वय वर्ष १२ पर्यंत, गट क्र. २ – वय वर्ष १६ पर्यंत,गट क्र. ३ – खुला गट – १६ वर्षापुढील **प्रवेश शुल्क रु. ५००/– प्रत्येक ग्रुपसाठी**

** नोंदणी केलेल्या स्पर्धकांना त्यांच्या स्पर्धेची दिनांक व वेळ मोबाईलवर अथवा ई–मेल वर कळविली जाईल. स्पर्धेसाठीचे सविस्तर परिपत्रक व नोंदणी अर्जासाठी मेल वर संपर्क साधावा. शाळांबरोबरच प्रायव्हेट क्लासेस अथवा वैयक्तिकरित्या स्पर्धेमध्ये नोंदणी करु शकतात.

## शाखा

**मुंबई** – मुख्याध्यापक भवन, ४ था मजला, प्लॉट नं. ६बी, सायन (प), मुंबई ४०००२२, दूरध्वनी (०२२) ४०९०४०८, मोबाईल ९०२९२९८२९४, ९८२०४७२६५०
**सांगली** – टि.म.वि. सांगली कॅम्पस, वसंतदादा इंडस्ट्रियल इस्टेट, केसरी कार्यालयाजवळ,सांगली–४१६४१६, दूरध्वनी (०२३३)२३१०८३८, मोबाईल ७५८८५८८५७३
**खारघर** –सेक्टर नं. १४, प्लॉट नं. ३, रघुनाथ विहारजवळ, खारघर, नवी मुंबई ४१०२१० मोबाईल ९८९२११०८९२

## प्रचारक

१. श्री. अनिल पाठक (श्रमसाफल्य, मु.पो. अनगाव, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३०२) – मो. क्र. ९९७५६६५९७८
२. ॲड. दिपिका सराफ – नृत्यकला (प्रचारक व भरतनाटयम् नृत्यकला मार्गदर्शक) (न्यू पनवेल, रायगड) – ९८३३८८९१२०
३. श्रीमती रेश्मा गोडांबे – नृत्यकला (प्रचारक) मो.क्र. ९३७१७९५०५७

## विभागीय कार्यालय

**औरंगाबाद** – मा. मथुरादास देशमुख
आविष्कार बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, प्लॉट नं. २, देवगिरी स्नेह अपार्टमेंट, रोशन हाउसिंग सोसा, गारखेडा परिसर, औरंगाबाद ४३१००५
दूरध्वनी ०२४०–६९९४०१६ मोबाईल ९९६०२९०००७
E-mail - mr.mvd53@rediffmail.com

**जळगाव** – मा. योगेश लाठी
आय.जी.एम. कॉम्प्युटर एज्युकेशन, लाठी प्लाझा, शाहू मार्केट समोर, गणेश कॉलनी रोड, जळगाव– ४२५००१,
दूरध्वनी (०२५७)२२४१८५१, मोबाईल ९८२२४६४९३१
E-mail - igmjalgaon@gmail.com

**नाशिक** – मा. गौरी जोशी
सुगम संस्कृतम् रिसर्च ॲड करिअर डेव्हलपमेंट सेंटर, ११ बालाजी पॅलेस, वडाळा पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक ४२२००९,
दूरध्वनी ०२५३–२३७०३५९/२३९५९२५
मोबाईल ९८८१०७५९२५, ९८९०४४५९२५,
E-mail - sugamtmv@gmail.com

**मुंबई** – मा. भूषण पिंपळे
श्री. सिद्धीविनायक इंन्फोटेक, शॉप नं. ६७, पहिला मजला, साई कृपा मॉल, एल.टी. रोड, दहिसर स्टेशन समोर, दहिसर (वेस्ट), मुंबई ४०००६८
दूरध्वनी (०२२)२८४८९९०५, मोबाईल ९७०२३०९३७१
E-mail - bhushanpimple@yahoo.co.in

**रायगड (महाड)** – मा. मच्छिंद्र सकपाळ
सुसंस्कार शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट, संस्कार कुंज, नवेनगर, मु.पो.ता. महाड, जि. रायगड ४०२३०१,
दूरध्वनी – (०२१४५) २२६३३७, मोबाईल ७७७६०४०४२१
E-mail - anilsakpal357@gmail.com

**डोंबिवली** – मा. विजयकुमार मांढरे
एम.जी.आय.टी. शॉप नं४, वेणू सोसायटी, आर.जी. पाटीलवाडी, नांदिवली क्रॉस रोड नं. २, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे ४२१२०१
मोबाईल क्र. ९८२१९१९६७०/९८७०२२४६३४
E-mail - mgitdombivli@gmail.com

**पिंपरी–चिंचवड** – मा. शकुंतला माटे
शाविमा लॅग्वेज इन्स्टिट्यूट, प्लॉट नं १७, 'समर्थ' श्रीधरनगर, माटे शाळेजवळ, चिंचवड, पुणे ४११०३३
मोबाईल ९८२२८०६६८७, ९८२२८६८०७७
E-mail - indrayanipisolkar@yahoo.com

# प्रास्ताविक

शालेय स्तरावरील इ. ४ थी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी तसेच इंग्रजी, गणित, विज्ञान इ. विषयांच्या अभ्यासाचा त्यांचा पाया पक्का व्हावा या हेतूने टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे दरवर्षी इंग्रजी, गणित, विज्ञान, संस्कृत, मराठी भाषा इत्यादी विषयांच्या परीक्षा वर्षातून फेब्रुवारी/सप्टेंबर या महिन्यांत घेतल्या जातात. तळागाळातील सर्वांना शिक्षण मिळावे. शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन व्हावे या उद्देशाने विद्यापीठ या परीक्षांचे आयोजन करीत असते. या परीक्षांचा अभ्यासक्रम शासनाने तयार केलेल्या शालेय अभ्यासक्रमास उपयुक्त व पूरक असल्याने या परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झालेल्या आहेत. शाळांमधील परीक्षांच्या गुणवत्ता यादीत येण्यासाठी या परीक्षांचा अभ्यास प्रेरक ठरला आहे. **शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या या परीक्षांचा उपयोग शालान्त परीक्षेच्या तयारीसाठी झाल्याचे अभिमानाने नमूद केलेले आहे. गेली अनेक वर्षे शालेय विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचे काम या परीक्षांच्या माध्यमातून विद्यापीठ करीत आहे.**

**इंग्रजी विषयासाठी इंग्रजी माध्यम / कॉन्व्हेंट शाळांसाठी उच्चस्तर व मराठी माध्यमासाठी निम्नस्तर अशा स्वतंत्र परीक्षांचे आयोजन केले जाते.**

बहुसंख्य शाळांच्या मागणीनुसार संस्कृत विषयाप्रमाणेच हिन्दी विषयाच्या परीक्षा सुरु केल्या आहेत तसेच, शालेय स्तरावर परदेशी भाषांचे ज्ञान अवगत व्हावे, लहान वयातच नवीन भाषेची गोडी निर्माण व्हावी यासाठी जपानी भाषेचे सुरुवातीपासून मार्गदर्शन व्हावे ही भाषा लिहीता, वाचता, बोलता यावी. भविष्यात जपानी, जर्मन सरकारची प्रमाणपत्र परीक्षा देता यावी यासाठी विद्यापीठामार्फत **जापनीज व जर्मन** या परदेशी भाषांच्या परीक्षा सुरु केल्या आहेत. भरतनाट्यम् व कथक नृत्यकलेप्रमाणेच ओडिसी नृत्यकलेत ४ परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमाचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा. या परीक्षांबाबत सविस्तर माहिती पुढे दिलेली आहे.

# शालेय परीक्षांची वैशिष्ट्ये

१. दरवर्षी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील सुमारे २००० पेक्षा जास्त शाळांमधून लाखांहून अधिक विद्यार्थी विद्यापीठाच्या शालेय परीक्षांना बसतात. विविध विषयांच्या इ.४थी ते १०वी साठी जवळपास ८८ परीक्षा वर्षातून दोन सत्रांत घेतल्या जातात.

२. **आकर्षक पारितोषिके –** विविध विषयांच्या प्रत्येक परीक्षांमध्ये एकूण विद्यार्थ्यांमध्ये गुणानुक्रमे पहिल्या दोन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येतात. तसेच सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे दिली जातात. सर्व विषयांच्या प्रत्येक परीक्षेस प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करणा–या विषय शिक्षकांना विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

३. **अध्यापक मानधन –** शाळांना परीक्षा व्यवस्थेसाठी होणारा सेवा खर्च व परीक्षांसाठी मार्गदर्शन करणा–या शाळेतील अध्यापकांना मानधन म्हणून साधारणतः परीक्षा शुल्काच्या २५% इतकी रक्कम दिली जाते. त्यामुळे शाळेला कोणताही आर्थिक बोजासहन करावा लागत नाही.

४. **जपानी भाषा प्रमाणपत्र परीक्षा व मार्गदर्शन–** शाळेच्या मागणीनुसार विद्यापीठातर्फे जर्मन व जापनीज भाषेच्या मार्गदर्शनासाठी मागणीनुसार माफक शुल्क आकारुन सी.डी. द्वारा शैक्षणिक साहित्य दिले जाते (अधिक माहितीसाठी विद्यापीठाशी संपर्क साधावा.) व्यवस्था करण्यात येते. जर्मन व जापनीज भाषेच्या प्रत्येकी ४ परीक्षा घेतल्या जातात.

# अत्यंत महत्त्वाच्या सूचना

विद्यापीठातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेण्यात येतात. त्या संदर्भात काही महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे –

- सर्व विषयांसाठी मिळून किमान २५ विद्यार्थी असतील तरच त्या शाळेस परीक्षा केंद्र दिले जाते.
- २५ पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असूनही परीक्षा केंद्र मागणी करणा–या शाळेस परीक्षा केंद्र दिले जाईल. मात्र शुल्कातील केंद्र खर्च व अध्यापक मानधन दिले जाणार नाही. त्यांना संपूर्ण शुल्क भरावे लागेल
- ज्या शाळांमधून या परीक्षा घेतल्या जात नाहीत अशा शाळेतील विद्यार्थ्यांना नजिकच्या विभागीय कार्यालयात/ विद्यापीठात **बहिस्थ विद्यार्थी** म्हणून परीक्षा देता येईल. (मार्गदर्शन करणाऱ्या क्लासेससाठी या परीक्षेला विद्यार्थ्यांना बसवता येईल.)

## नवीन केंद्र व केंद्र क्रमांक

१. शाळेला नवीन केंद्र सुरू करावयाचे असल्यास त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावांच्या यादीबरोबरच खाली दिलेल्या मुद्दयांप्रमाणे केंद्र सुरू करण्यासाठीचे विनंती पत्र द्यावे. अगोदर केंद्र परवानगीचे मंजुरी पत्र पाठविण्याची गरज नाही.

**केंद्र सुरू करण्यासाठीच्या अर्जाचे मुद्दे** – शाळेचे नाव – पूर्ण पत्ता ( मु.पो.,ता. जि., पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई.मेल आय डी.) – शाळा (केंद्र) संचालक/मुख्याध्यापकांचे संपूर्ण नाव – शाळेची एकूण विद्यार्थी संख्या – शाळेचे माध्यम –(प्राथमिक, माध्यमिक) – गावात नियमित टपाल मिळते का? (पोस्ट/कुरीयर)– शाळेत संगणक लॅब आहे का?

२. आपल्या केंद्राची नोंदणी झाल्यावर नेहमीसाठी विद्यापीठाने दिलेला कायमचा केंद्र क्रमांक प्रत्येक यादीवर व पत्रव्यवहारावर लिहावा. प्रत्येक परीक्षेसाठी त्या शाळेला एकच केंद्र क्रमांक राहील. सर्व पत्रव्यवहारांवर कायमचा केंद्र क्रमांक व शाळेचे नाव लिहावे.

## शुल्क व यादी पाठविताना

१. विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी पाठविताना पुढे दिलेल्या तक्त्याप्रमाणे यादी तयार करून योग्य त्या शुल्कासह पाठवावी किंवा विभागाच्या E-mail:tmvshaleyaprasar@gmail.com यावर Attachment मध्ये यादी पाठवावी. यापुढे जलद संपर्कासाठी मेलचा वापर केला जाणार आहे. आपणही आपला पत्रव्यवहार ई–मेल आयडीद्वारे करावा. हाताने लिहिलेल्या याद्या स्वच्छ व सुबक हस्ताक्षरात असाव्यात.

**यादीसाठीचा मजकूर पुढील मुद्दयानुसार असावा** – शाळेचे नाव –शाळेचा पूर्ण पत्ता, पीन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल आय डी. –परीक्षेचा विषय व परीक्षेचे नाव – परीक्षा कोड क्र.–☐☐☐ (शुल्क तक्त्यावर पहावा) केंद्र क्र.–☐☐☐☐☐ विषय शिक्षकाचे नाव (पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या शिक्षकांना गौरविण्यासाठी आवश्यक तसेच विद्यापीठाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी), इयत्तेनुसार वेगळे शिक्षक असल्यास त्याप्रमाणे नाव व मोबाईक क्र.कळवावे याबरोबर शिक्षकांच्या नावाचा उल्लेख नसल्यास पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीत त्या शिक्षकांचा उल्लेख केला जाणार नाही याची नोंद घ्यावी – शाळा माध्यम – मराठी/इंग्रजी/हिंदी (यादी एम.एस.ऑफीस मध्ये एक्सेल शीटमध्ये आडनाव, नाव, वडिलांचे नाव हे वेगवेगळया रकान्यात टाईप करुन पाठवावे.)

२. इंग्रजी विषयाची यादी पाठविताना विद्यार्थी उच्चस्तराच्या / निम्नस्तराच्या परीक्षेस बसणार आहेत याचा उल्लेख करावा.

३. विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या (संगणकाद्वारे टंकलेखित केलेल्या) सर्व विषयांसाठी इंग्रजीतूनच (Capital Letters Only) पाठवाव्यात. आपली शाळा इंग्रजी माध्यम किंवा मराठी माध्यम आहे याचा स्पष्ट उल्लेख यादीत असावा.

**शुल्काबाबत**

शुल्काच्या हिशोबात सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने सुटसुटीत शुल्काचा तक्ता तयार केला आहे.(शुल्क तक्ता पहावा) शाळांनी विभागीय कार्यालयाच्या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन टपाल/कुरीयरचा खर्च वाचवावा. नमुन्याप्रमाणे यादी पाठविताना त्यासोबत सर्व परीक्षांच्या एकत्रित किंवा प्रत्येक विषयाचा स्वतंत्र (शाळेच्या सोयीप्रमाणे) शुल्काचा हिशोब पुढे दिलेल्या मुद्दयांप्रमाणे करून पाठवावा. शाळेचे नाव –शाळेचा पूर्ण पत्ता, पिन कोड, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, ई–मेल इ. – परीक्षेचे नाव –, परीक्षा कोड क्र.–

केंद्र क्र. –

**शुल्क पाठविताना घ्यावयाची काळजी**

१. शुल्क पाठविताना कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्ट मा. कार्यवाह, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या नावाने काढून याद्यांसोबत विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे पाठवावा. डी.डी. व्यतिरिक्त आपण यूको बँकेच्या मुकूंदनगर शाखेत विद्यापीठाच्या खाते क्र. १६८४०१००००६१११ (IFC Code UCBA0001684) व बँक ऑफ महाराष्ट्रच्या टि.म.वि. कॉलनी शाखेत खाते क्र. २००२७०५२४६१ (IFC Code MAHB0000320) मध्ये स्थानिक बँकेच्या शाखेमधून मनी ट्रान्सफर ने शुल्क जमा करता येईल.

२. मनी ट्रान्सफर ने बँकेत पैसे भरल्याच्या मूळ पावतीची एक झेरॉक्स आपणाजवळ ठेवावी व मूळ पावती याद्यांसोबत शुल्काच्या तपशीलासह विद्यापीठाच्या शालेय प्रसार परीक्षा विभागाकडे किंवा विभागीय कार्यालयाकडे पाठवावी. शुल्क भरल्याची पावती असेल तरच याद्या स्वीकारल्या जातील. चेक व मनीऑर्डर स्वीकारली जाणार नाही.

३. विद्यापीठात सोम. ते शुक्र. स. १० ते १ व २ ते ४ व शनि. स. १० ते १२ वाजेपर्यंत समक्ष याद्या व रोख शुल्क स्वीकारले जाईल. विभागीय कार्यालयात याद्या व शुल्क स्वीकारण्याच्या वेळेसाठी त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

४. शुल्क तक्त्यात (पान क्र. ९ ते ११) * कॉलम १ – विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे शुल्क, ** कॉलम २ – शाळेकडे ठेवायचे शुल्क *** कॉलम ३ – विद्यापीठाकडे पाठवावयाचे शुल्क (कॉलम २ मध्ये अध्यापक मानधन सरासरी + सेवाखर्च + केंद्रप्रमुख मानधन याचा समावेश आहे.) **टिप :** ऐनवेळी परीक्षेस बसणा–या विद्यार्थ्यांस संपूर्ण शुल्क (रु. ८०,९०) तसेच प्रत्येक परीक्षेसाठी विलंब शुल्क रु. १५/– व नृत्यकला परीक्षेसाठी विलंब शुल्क रु. ३०/– घेण्यात येईल.

**परीक्षेपूर्वी व परीक्षेनंतर**

१. यादी प्राप्त झाल्यानंतर विषयवार परीक्षांप्रमाणे प्रत्येक केंद्रांना विद्यार्थ्यांच्या आसन क्रमांकांची यादी (उपस्थिती पत्रक – निळे पाकीट जे उत्तरपत्रिकेच्या खाकी पाकीटावर चिटकविलेले असते) व आवश्यक त्या उत्तरपत्रिका (प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका एकच असते) परीक्षेपूर्वी किमान ५ दिवस आधी विद्यापीठाकडून/ विभागीय कार्यालयाकडून शाळांना वितरित केल्या जातात. **खाकी पाकीटावरील स्वतंत्र निळ्या रंगाच्या पाकिटात ज्यावर आपला पत्ता लिहिलेला आहे त्या पाकिटात असलेली आसन**

**क्रमांकाची यादी आपण पाठविलेल्या यादीप्रमाणे बरोबर असल्याची परीक्षेपूर्वी खात्री करून घ्यावी. सर्व परीक्षा विद्यापीठाने निश्चित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच घ्याव्यात**

२. उपस्थितिपत्रकावर परीक्षेस उपस्थित असणा-या विद्यार्थ्याची त्याच्या नावापुढे सही घ्यावी. अनुपस्थित विद्यार्थ्यांच्या नावापुढे लाल शाईने अनुपस्थित लिहावे. अनुपस्थित क्रमांकावर ऐनवेळच्या दुस-या विद्यार्थ्यांचे नाव टाकू नये हे ग्राहय धरले जाणार नाही. उपस्थितिपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये. यादीत नाव नसल्यास तसेच परीक्षेस ऐनवेळी बसणा-या विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व परीक्षा शुल्क विलंब शुल्कासहित उत्तरपत्रिकेबरोबरच पाठवावे. सदर विद्यार्थ्यांस त्या परीक्षेच्या उपस्थिती पत्रकावरील शेवटचा आसन क्रमांक देऊन त्यापुढे A/B/C असे लिहावे. **उदा.** शेवटचा आसन क्र. १०१ असल्यास त्यापुढील ऐनवेळच्या पहिल्या विद्यार्थ्यास १०१ Aदुस-या विद्यार्थ्यास १०१ B या प्रमाणे आसन क्र. द्यावेत. आसन क्रमांकाच्या यादीतील नावांमध्ये काही दुरूस्त्या असल्यास उपस्थितिपत्रकावर संबंधित नावाला/शब्दाला/अक्षराला लाल पेनने गोल करून सुधारणा करावी किंवा स्वतंत्र कागदावर आसन क्रमांकासह चुकीचे नाव व त्यापुढे सुधारित नाव अशी यादी पाठवावी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या नावावरच प्रमाणपत्र दिली जातात त्यामुळे विषय शिक्षकांनी नावात चूक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. परीक्षा झाल्यानंतर दुस-याच दिवशी परीक्षेच्या उत्तरपत्रिका व उपस्थितिपत्रक समक्ष, टपालाद्वारे किंवा कुरिअरने विद्यापीठाकडे/विभागीय केंद्राकडे पाठवव्यात. उत्तरपत्रिका एस.टी. पार्सलने पाठवू नयेत.

४. परीक्षा निर्णयाबाबत व प्रमाणपत्राबाबत काही शंका असल्यास निर्णय जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांपर्यंत विद्यापीठाच्या शालेय परीक्षा विभागाकडे संपर्क साधावा. परीक्षा निर्णयानंतर पुढील परीक्षेपूर्वी उत्तरपत्रिका निर्लेखित केल्या जातात.

५. परीक्षा निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून २० दिवसांच्या आत उत्तरपत्रिकांचे पुनर्निरीक्षणासंबंधीचे अर्ज मुख्याध्यापक, केंद्रसंचालक यांच्यामार्फत स्वीकारण्यात येतात. प्रत्येक उत्तरपत्रिकेसाठी रु. ३०/- याप्रमाणे पुनर्निरीक्षण शुल्क अर्जासोबत पाठवावे लागते. डुप्लिकेट प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ५०/- रुपये शुल्क आकारण्यात येते.

६. **केंद्रांनी तात्काळ सेवेसाठी जास्तीत जास्त ई-मेल सुविधेचा वापर करावा.**

वरील सर्व सूचनांची नोंद घ्यावी व परीक्षेबाबत विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती. -

**कार्यवाह**


**विभागाची प्रकाशने**

१. संस्कृतभाषाप्रारम्भः/संस्कृतभाषाप्रवेशः - रु. ५०/-
२. संस्कृतभाषापरिचयः - रु. २५/-
३. संस्कृतभाषाजिज्ञासा - रु. ४०/-
४. संस्कृतभाषारसास्वादः - रु. ४०-
५. संस्कृतभाषाभिज्ञः - रु. ४०/-
६. नृत्यकला अभ्यासक्रम मार्गदर्शक पुस्तिका - रु. ५०/-
७. हिंदी प्रवेश - रु. ३०/-
८. हिंदी प्रारंभ - रु. ४०/-
९. लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन - रु. ५०/-
पुस्तक १ ले (इंग्रजी प्री-एलिमेंटरी व एलिमेंटरी परीक्षेसाठी)
१०.लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन - रु. ६०/-
पुस्तक २ रे (इंग्रजी इंटरमिडीएट व ज्युनियर परीक्षेसाठी)
११.लोकमान्य इंग्लिश ग्रामर व कॉम्पोझीशन - रु. ७०/-
पुस्तक ३ रे (इंग्रजी सिनीयर व ॲडव्हांस परीक्षेसाठी)
१२. माय जापनीज - शोदान १ व २ - रु. १००/-
१३ Deutsch für alle 1 - रु. १५०/-
(जर्मन प्री-एलिमेंटरी परीक्षेसाठी)

**वरील सर्व पुस्तके पुढील ठिकाणी उपलब्ध आहेत : शालेय प्रसार परीक्षा विभागाची सर्व विभागीय कार्यालये व उज्ज्वल ग्रंथ भांडार / रवीन्दु बुक सेलर्स, ६८३, अप्पा बळवंत चौक, पुणे ३०, (बुधवार बंद)**
**दूरध्वनी : ९९७५५८४३२२, २४४६२२६८**

# पारितोषिके

♦ शालेय स्तरावरील संस्कृत, मराठी उच्चस्तर, इंग्रजी निम्नस्तर, गणित या विषयांच्या सर्व परीक्षांमध्ये एकूण विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणा–या विद्यार्थ्यांना बहुसंख्य पालक व शिक्षक यांच्या मागणीनुसार देण्यात येणाऱ्या रोख रुपये २००/– व रु. १००/– ऐवजी त्या रक्कमेतून **ट्रॉफी व मेडल दिले जाणार आहे.**

♦ विषयांमधील प्रत्येक परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या विषय शिक्षकास विशेषप्रमाणपत्र देऊन सन्मानित केले जाते.

♦ **नविन पारितोषिके** – सत्र सप्टेंबर २०१३ पासून विद्यापीठातर्फे खालील परीक्षांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना खालील पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. (सर्व पारितोषिके प्रथम क्र रोख रु. २००/– व द्वितीय क्र रोख रु.१००/– गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना ही पारितोषिके शाळेच्या पत्त्यावर मनिऑर्डरने पाठविली जातील.)

१. **भागवत पारितोषिक –** गणित पहिली, तिसरी व पाचवी परीक्षा (प्रथम क्र.)

२. **लोकमान्य टिळक पारितोषिक** – गणित पहिली, तिसरी व पाचवी परीक्षा (द्वितीय क्र.), जपानी भाषा स्तर १, स्तर ३ व स्तर ४ (प्रथम क्र.)

३. **कै. गुरुदेव रानडे पारितोषिक** – जपानी भाषा स्तर १, स्तर ३ व स्तर ४ (द्वितीय क्र.), एस.एल.सी.आय.टी. स्तर १ व स्तर ४ (प्रथम व द्वितीय क्र.) एफ.एफ.सी.ई स्तर १, स्तर ३ व स्तर ५ (प्रथम व द्वितीय क्र.) हिंदी तिनही परीक्षा (प्रथम व द्वितीय क्र.) नृत्यकला पदविका (भरतनाटयम्) (प्रथम व द्वितीय क्र.)

# स्पर्धा पारितोषिके

## मराठी, संस्कृत, इंग्रजी व हिंदी माध्यमातून वक्तृत्व स्पर्धा

**मराठी व इंग्रजी माध्यमाच्या स्पर्धेसाठी प्रत्येक गटास खालीलप्रमाणे रोख पारितोषिके देण्यात येतात. प्रथम क्रमांक–** रु.१०००/–**द्वितीय क्रमांक–** रु.७००/– **तृतीय क्रमांक –**रु.५००/– **उत्तेजनार्थ –** रु.३००/– विभागून. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येते तसेच सर्व गटांत मिळून जास्तीत जास्त क्रमांक मिळविण्या–या शाळेस सर्वसाधारण विजेतेपद दिले जाते. अशा शाळेस स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येते. **संस्कृत व हिंदी माध्यमाच्या स्पर्धेची पारितोषिके रक्कम स्पर्धेच्या वेळी जाहिर करण्यात येणार आहेत.**

## नृत्यकला स्पर्धा

भरतनाटयम् व कथक नृत्यकला शैलीत जुलै महिन्यात दरवर्षी स्पर्धेचे आयोजन केले जाते. त्या स्पर्धेस खालील प्रमाणे पारितोषिके दिली जातात. **स्पर्धेची पारितोषिके**

**ग्रुप डान्स** – प्रथम क्रमांक – रु. १०००/–, द्वितीय क्रमांक– रु. ७५०/–, तृतीय क्रमांक – रु. ५००/–

**सर्व गटांस** – प्रथम क्रमांक – रु. ७५०/–, द्वितीय क्रमांक– रु. ५००/–, तृतीय क्रमांक – रु. ३००/–

सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येते.

# सुधारित परीक्षा शुल्क तक्ता

पान क्र. ६ वरील
सूचना क्र. ४ पहावी.

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| | **एस.एल.सी.आय.टी. परीक्षा (मराठी व इंग्रजी माध्यम) संगणक विषय परीक्षा** | | | |
| ०१ | SLCIT Level 1 इ. ५वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०२ | SLCIT Level 2 इ. ६वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०३ | SLCIT Level 3 इ. ७वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०४ | SLCIT Level 4 इ. ८वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०५ | SLCIT Level 5 इ. ९वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| ०६ | SLCIT Level 6 इ. १०वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| | **संस्कृत** | | | |
| ११ | संस्कृतभाषाप्रारम्भः (प्रथमा) इ.५वी (तोंडी) | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| १२ | संस्कृतभाषाप्रवेशः (द्वितीया) इ.६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| १३ | संस्कृतभाषापरिचयः (तृतीया) इ. ७ वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| १४ | संस्कृतभाषाजिज्ञासा (चतुर्थी) इ. ८ वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| १५ | संस्कृतभाषारसास्वादः (पंचमी) इ. ९ वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| १६ | संस्कृतभाषाभिज्ञः (षष्ठी) इ. १० वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| निम्न/उच्च | **इंग्रजी (निम्नस्तर / उच्चस्तर)** | | | |
| २०/२२० | इंग्रजी प्रवेश इ. ४ थी (सप्टेंबर /फेब्रुवारी) | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| २१/२२१ | इंग्रजी प्री–एलिमेंटरी इ. ५वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| २२/२२२ | इंग्रजी एलिमेंटरी इ.६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| २३/२२३ | इंग्रजी इंटरमिडीएट इ.७वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| २४/२२४ | इंग्रजी ज्युनियर इ. ८वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| २५/२२५ | इंग्रजी सिनीयर इ. ९ वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| २६/२२६ | इंग्रजी ॲडव्हांस इ. १० वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| २७ | इ. ११ वी व १२ वी साठी | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| | **मराठी उच्चस्तर/निम्नस्तर** | | | |
| ३० | मराठी प्रवेश इ. ४ थी (फक्त फेब्रुवारी सत्रात) | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ३१/३५ | मराठी पहिली इ.५वी व ६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ३२/३६ | मराठी दुसरी इ.७ वी व ८वी | ९०.०० | २०.०० | ६५.०० |
| ३३/३७ | मराठी तिसरी इ.९ वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| ३४/३८ | मराठी चौथी इ.१० वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| | **गणित** | | | |
| ४१ | गणित प्रवेश इ. ४थी (सप्टेंबर /फेब्रुवारी) | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ४२ | गणित पहिली इ.५वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| ४३ | गणित दुसरी इ. ६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ४४ | गणित तिसरी इ. ७वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ४५ | गणित चौथी इ. ८वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| ४६ | गणित पाचवी इ. ९वी (फेब्रुवारी) | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| ४७ | गणित सहावी इ. १०वी (नोव्हेंबर) | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| | **विज्ञान (फक्त फेब्रु. सत्रात)** | | | |
| ५० | विज्ञान परीक्षा प्रवेश इ. ४ थी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ५१ | विज्ञान परीक्षा पहिली इ. ५वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ५२ | विज्ञान परीक्षा दुसरी इ. ६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ५३ | विज्ञान परीक्षा तिसरी इ. ७वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ५४ | विज्ञान परीक्षा चौथी इ. ८वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| ५५ | विज्ञान परीक्षा पाचवी इ. ९वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| ५६ | विज्ञान परीक्षा सहावी इ. १०वी (नोव्हेंबर) | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| | **इंग्रजी संभाषण** | | | |
| ६१ | इंग्रजी संभाषण पहिली तोंडी परीक्षा इ.५वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ६२ | इंग्रजी संभाषण दुसरी तोंडी परीक्षा इ.६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ६३ | इंग्रजी संभाषण तिसरी तोंडी परीक्षा इ.७वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| | **मराठी संभाषण** | | | |
| ७० | मराठी संभाषण पहिली तोंडी परीक्षा इ.५वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ७१ | मराठी संभाषण दुसरी तोंडी परीक्षा इ.६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ७२ | मराठी संभाषण तिसरी तोंडी परीक्षा इ.७वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| | **मराठी लेखन कौशल्य** | | | |
| ७३ | मराठी पहिली परीक्षा इ. ५वी व ६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ७४ | मराठी दुसरी परीक्षा इ. ७वी व ८वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| | **इंग्रजी लेखन कौशल्य** | | | |
| ७५ | इंग्रजी पहिली परीक्षा इ. ५वी व ६वी | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ७६ | इंग्रजी दुसरी परीक्षा इ. ७वी व ८वी | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| | **नृत्यकला भरतनाटयम्** | | | |
| ८१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ८२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ८३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ४००.०० | १००.०० | ३००.०० |
| ८४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ४००.०० | १००.०० | ३००.०० |

| परीक्षा कोड क्र. | परीक्षा | कॉलम १ * रूपये | कॉलम २ ** रूपये | कॉलम ३ *** रूपये |
|---|---|---|---|---|
| | **नृत्यकला कथक** | | | |
| ९१ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ९२ | प्रगत (प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ९३ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ४००.०० | १००.०० | ३००.०० |
| ९४ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ४००.०० | १००.०० | ३००.०० |
| | **नृत्यकला ओडिसी (नविन परीक्षा)** | | | |
| ९६ | प्रारंभिक (प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ९७ | प्रगत (प्रात्यक्षिक) | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| ९८ | मध्यमा (लेखी व प्रात्यक्षिक) | ४००.०० | १००.०० | ३००.०० |
| ९९ | पदविका (लेखी व प्रात्यक्षिक) | ४००.०० | १००.०० | ३००.०० |
| | **फाऊंडेशन फॉर कॉंपिटेटीव्ह एक्झाम (स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी)** Online | | | |
| १०१ | FFCE Level 1 इ. ५वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०२ | FFCE Level 2 इ. ६वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०३ | FFCE Level 3 इ. ७वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०४ | FFCE Level 4 इ. ८वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०५ | FFCE Level 5 इ. ९वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| १०६ | FFCE Level 6 इ. १०वी च्या अभ्यासक्रमावर | १००.०० | २५.०० | ७५.०० |
| | **हिन्दी** | | | |
| ११५ | हिन्दी प्रवेश (टि.म.वि. पुस्तकावर आधारित) | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ११६ | हिन्दी प्रारंभ (टि.म.वि. पुस्तकावर आधारित) | ८०.०० | २०.०० | ६०.०० |
| ११७ | हिन्दी प्राविण्य (इ. ८वी,९वी व १०वी च्या पुस्तकातील व्याकरणावर आधारित अभ्यासक्रम) | ९०.०० | २५.०० | ६५.०० |
| | **जपानी भाषा (मार्गदर्शन शुल्काव्यतिरिक्त)** | | | |
| १२१ | शोदान १ (पुस्तकासह) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १२२ | शोदान २ (पुस्तकासह) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १२३ | शोदान ३ (पुस्तकाशिवाय) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १२४ | शोदान ४ (पुस्तकाशिवाय) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| | **जर्मन भाषा (मार्गदर्शन शुल्काव्यतिरिक्त)** | | | |
| १३१ | जर्मन प्री-एलिमेंटरी | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| १३२ | जर्मन एलिमेंटरी | २५०.०० | ७५.०० | १७५.०० |
| १३३ | जर्मन इंटरमिडीएट | ३००.०० | ७५.०० | २२५.०० |
| १३४ | जर्मन ॲडव्हांस | ३५०.०० | ७५.०० | २७५.०० |

**** इंग्रजी व मराठी विषयाची यादी पाठविताना यादीवर उच्चस्तर / निम्नस्तर याचा उल्लेख करावा.**

# विभागीय कार्यालय

१. शाळांना (केंद्रांना) तत्पर सेवा मिळावी, टपालाद्वारा/कुरीयरने होणारा खर्च, विलंब व अनिश्चितता टाळण्याच्या उद्देशाने काही निवडक जिल्हयांच्या ठिकाणी विद्यापीठाच्या शाखा/विभागीय केंद्र सुरू करण्यात आली आहेत. त्याची सविस्तर माहिती माहितीपुस्तिकेत सुरुवातीस देण्यात आली आहे.

२. या केंद्रांवर परिसरातील/जिल्हयातील शाळांसाठी खालील सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तरी शाळांनी त्याचा लाभ घ्यावा.
• परीक्षा याद्या व शुल्क स्वीकारणे. • परीक्षा साहित्य शाळांना/ केंद्रांना वितरित करणे. • परीक्षा कालावधीत शाळांना/केंद्रांना भेटी देणे. • परीक्षा झाल्यानंतर शाळांतून/केंद्रांतून येणा-या उत्तरपत्रिका स्वीकारणे. परीक्षांचा निर्णय व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र शाळांना वितरीत करणे. • पुस्तक विक्री, विविध मेळावे व कार्यशाळा यांचे आयोजन. • परीक्षांबाबत शाळांच्या शंका, सूचना, तक्रारी सोडविण्यासाठी विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहणे.

३. विद्यापीठाच्या शाखा/विभागीय कार्यालयाच्या परिसरातील शाळांनी केंद्रासाठी अथवा परीक्षांच्या सर्व प्रकारच्या कामांसाठी पुणे मुख्य कार्यालयाशी संपर्क न साधता त्या जिल्हयातील/परिसरातील विभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा.

४. ज्या केंद्रांच्या जवळपास शाखा/विभागीय कार्यालये नाहीत अशा केंद्रांनी परीक्षांबाबत पुणे कार्यालयाशी संपर्क साधावा.

५. शाखांमधून किंवा विभागीय कार्यालयातून चालणा-या सर्व कामावर तसेच सर्व विषयाच्या परीक्षांवर विद्यापीठाचे संपूर्ण नियंत्रण राहील. विभागीय कार्यालय हे विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून काम करतील. विभागीय कार्यालयांना विद्यापीठाकडून सर्व कामकाजासाठी मानधन दिले जाते. त्यामुळे विद्यापीठ शुल्काव्यतिरीक्त इतर कोणतीही जादाची रक्कम शाळांनी विभागीय कार्यालयास देऊ नये. भविष्यात इतरही जिल्हयांमध्येही मागणीनुसार विभागीय कार्यालय सुरू करण्यात येतील.

# प्रचारक

विद्यापीठाच्या शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या या विविध विषयांच्या परीक्षांबाबतचा उपक्रम जास्तीत जास्त शाळांना माहीत व्हावा या उद्देशाने विद्यापीठ प्रचारक नियुक्त करीत आहे. नव्याने नोंदणी करणा-या शाळेतील विद्यार्थी संख्येनुसार प्रचारकांना मानधन देण्यात येईल. इच्छुक व्यक्तींनी दूरध्वनीवरून वा प्रत्यक्ष विभागाशी संपर्क साधावा.

आपल्या शंका, सूचना, तक्रारी यांचे जलद निवारण करण्यासाठी खालील व्यक्तिंशी संपर्क साधावा.

**विभागप्रमुख –** • राजीव देशपांडे – ९८२३०४५७७९, • सारिका तांबे – ९९७५१९२७६५
• योगेश सराफ – ९६६५५१०००७ • पौर्णिमा कुलकर्णी – ९७६५६०४५१८,